# निशाणी ५० वरील आदेश

**( किशोर केरकर वि. रमाकांत केरकर व.८ )**

**CNR.No.MHSI04-000034-2022**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी कोर्ट कमिशनर यांची नेमणूक होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांच्या कथनाप्रमाणे वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान रे.के.नं.६२/१९८७ चा दावा प्रलंबित होता. त्याकामी न्यायालयाने निकाल देताना तो दावा अंशत: मंजूर केला. त्यानुसार या न्यायालयात रे.द.नं.२८/१९९४ ची दरखास्त प्रलंबित असून, त्याकामी वकिल श्री.सुधीर प्रभू यांचेमार्फत कोर्ट कमिशन नेमणेत येवून घर क्र.७५, ७६ व ७७ मधील खोल्यांचे वादी व प्रतिवादी क्र. १ ते ६ यांचेदरम्यान वाटप करणेत आले. परंतु, जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचेकडे पाठविणेत आलेल्या प्रिसेप्ट अदयाप अंमलबजावणी होवून परत आला नसतानाही प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये असणाऱ्या मोकळया जमिनीमध्ये दांडगाईने बांधकाम सुरू केलेले आहे. वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान सदर मोकळया जागेचे अदयाप स्वतंत्र हिस्सा झालेला नसतानाही प्रतिवादी क्र. १ यांनी वाढीव बांधकाम सुरू केलेले आहे. सदरची बाब न्यायालयासमक्ष येणेकरिता तसेच नेमके किती क्षेत्र बांधकाम केलेले आहे. त्याची वस्तूस्थिती न्यायालयासमक्ष येणेकरिता उप–अधिक्षक भूमिअभिलेख कुडाळ यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक व्हावी अशी विनंती वादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी केलेली आहे.

३. सदर अर्जास प्रतिवादी क्र.१ यांनी निशाणी ६९ वर म्हणणे दाखल करून सदर अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. त्यांचे कथनाप्रमाणे वादी यांनी प्रस्तुतचा दावा दाखल करताना दाव्यासोबत दाखल केलेल्या नकाशामध्ये वादातीत बेकायदेशीर बांधकाम क्षेत्र दर्शविलेले

आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज चालणेस पात्र नाही. प्रतिवादी क्र.४ यांना वाटपाने आलेले क्षेत्र प्रतिवादी क्र.४ यांनी प्रतिवादी क्र. १ यांचे हक्कात ई–मेलद्वारे पाठविलेल्या पत्रान्वये हस्तांतरीत केलेले आहे. त्यानुसार प्रतिवादी क्र. १ हे सदर मिळकतीमध्ये बांधकाम करत असलेची बाब स्वत: प्रतिवादी क्र. १ मान्य करत आहे. तशी कैफियत त्यांनी अभिलेखावर दाखल केलेली आहे. तसेच अर्जात नमूद केलेले वाढीव बांधकाम क्षेत्र ८५६.४३ चौ.फुट क्षेत्र हे प्रस्तुत दाव्याचे कामी वाद विषय नाही. या सर्व कारणांचा एकत्रित विचार करता वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज पुरावा गोळया करण्याच्या गैरउद्देशाने दाखल केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी केलेली आहे.

**४.** वादी व प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच निशाणी ७८ वर दाखल वादी यांचा देखील युक्तीवाद पाहिला. अभिलेखावरील कागदपत्रांचे व प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता, वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान रे.के.नं.६२/१९८७ दावा प्रलंबित होता. त्याकामी झालेल्या न्यायनिर्णयाप्रमाणे रे.द.नं.२८/१९९४ ची दरखात या न्यायालयात प्रलंबित असल्याचे व त्याकामी मा.जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचेकडे पाठविणेत आलेले प्रिसेप्ट अदयाप पावेतो दावा मिळकतीचा स्वतंत्र हिस्सा होवून परत आले नसल्याचे वादी यांनी कथन केले आहे. याचा अर्थ वादी यांनी अर्जात नमूद केलेल्या क्षेत्राबाबत अदयाप रितसर अहवाल प्राप्त झाला नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सदर दरखास्तीचे कामी दावा मिळकत क्षेत्राबाबत योग्य व पुरेपूर अहवाल सादर होणार असल्याची बाब दिसून येत आहे. त्यामुळे प्रस्तुतकामी वादी यांनी कथन केलेप्रमाणे कोर्ट कमिशनर यांची नेमणूक होणे गरजेचे का आहे ही बाब वादी यांनी स्पष्ट स्वरूपात कथन केले नसल्याचे दिसून येते.

५. तसेच प्रतिवादी यांनी कथन केलेप्रमाणे प्रतिवादी क्र. ४ यांनी प्रतिवादी क्र.१ यांचे हक्कात सदर न्यायनिर्णयामध्ये व दरखास्तीमध्ये नमूद त्यांचे हिश्यात आलेले क्षेत्र लिहून दिले असलेची बाब वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान होणाऱ्या अंतिम पुराव्याअंती ठरणारी बाब आहे. प्रतिवादी क्र.४ यांनी प्रतिवादी क्र. १ यांचे हक्कात त्यांचे क्षेत्र लिहून दिले किंवा कसे ही बाब सद्यस्थितीमध्ये अस्पष्ट असून, सदरची बाब वादी यांनी नाकारलेली आहे. परंतु वादी यांचे प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता, दाव्याचेकामी प्रतिवादी म्हणतात त्याप्रमाणे क्षेत्र ८५६.४३ चौ.फुट हे क्षेत्र वाद विषय नसल्याचे दिसून येत आहे. यावरून वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मोघम स्वरूपाचा असल्याचे दिसून येत आहे.

६. वादी यांनी प्रस्तुतकामी निशाणी ८१ सोबत पुढील न्यायनिर्णय अभिलेखावर सादर केले आहेत.

1] Padam Sen and Another Vs. The State of Uttar Pradesh
AIR 1961 SC 218
2] Annappa Mhestha Vs. Mutayya Achari
(2002) 3 KARLJ 650

सदर न्यायनिवाडयांमध्ये मा.वरिष्ठ न्यायालय यांनी असे निष्कर्षित केले आहे की, जर वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान असणारा वाद विषय हा योग्यपणे न्यायनिर्णयीत होणेकरिता कोर्ट कमिशनर यांची नेमणूक होणे गरजेची असेल त्यावेळेस तसा आदेश पारीत करणे न्यायोचित ठरेल. तसेच जर एखाद्या पक्षकारास त्याचा योग्य पुरावा अभिलेखावर सादर करणे अडचणीचे असेल त्यावेळी कोर्ट कमिशनर यांची नेमणूक करता येवू शकेल. परंतु, अभिलेखावरील दाखल कागदपत्रांवरून तशी शक्यता आढळून येत नसेल तर कोर्ट कमिशनर यांची नेमणूक होणेबाबत दाखल

केलेला अर्ज न्यायालय नामंजूर करू शकेल असा निष्कर्ष मा. न्यायालयाने नोंदविल्याचे दिसून येत आहे.

**७.** वादी यांनी प्रस्तुतकामी निशाणी ७८ वर त्यांचा लेखी युक्तीवाद सादर केला असून,त्यामध्ये पुढील मा.ना. वरिष्ठ न्यायालयांचा न्यायनिवाडयांचा उल्लेख केला असल्याचे दिसून येते.

1] Amrish Kilachand Vs. Indian Commercial Co.
(1997) 10 SCC 95.

वादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांचे कथनाप्रमाणे, स्थानिक चौकशी करण्याचा हेतू हा निव्वळ पुरावा गोळा करणे असा नसून महत्त्वाची माहिती अभिलेखावर आणणे असे आहे असा निष्कर्ष मा.न्यायालयाने नमूद केल्याचे कथन वादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी लेखी युक्तीवादादरम्यान नमूद केल्याचे दिसून येते.

2] Southern Command Mes employees Co-op.
Credit Society Vs.V. K. K. Nambiar
AIR 1988 SC 2126

वादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांचे कथनाप्रमाणे, न्यायालय कोणत्याही पक्षकारास कोणताही योग्य पुरावा कोर्ट कमिशनर यांचेमार्फत अभिलेखावर सादर करणेस नकार देवू शकणार नाही. तसा अभिलेखावर आलेला पुरावा न्यायालयास पक्षकारांमधील वाद विषय संपुष्टात येणेकरिता मदत करणारा असल्याने त्यामुळे न्यायालयास पक्षकारांमधील वाद विषयाबाबत ओळख, त्याची वस्तूस्थिती व वर्णन अभिलेखावर येवू शकेल असा निष्कर्ष मा.न्यायालयाने नमूद केल्याचे कथन वादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी लेखी युक्तीवादादरम्यान नमूद केल्याचे दिसून येते.

८. सदर न्यायनिर्णयांचे अवलोकन केले असता, सदर मा.न्यायालय यांच्या न्यायनिर्णयातील घटनाक्रम हा प्रस्तुत प्रकरणातील घटनाक्रमाशी मिळत जुळता नसल्याचे दिसून येत आहे. प्रस्तुतकामी वादी यांनी नमूद केलेल्या मिळकतीबाबत रे.द.नं.२८/१९९४ ची दरखास्त प्रलंबित असल्याचे वादी यांनी नमूद केलेले असून, त्याकामी मा.जिल्हाधिकारी यांचा अंतिम आदेश होणेबाकी असल्याचे देखील वादी यांनी कथन केलेले आहे. तसेच प्रतिवादी क्र.४ यांनी प्रतिवादी क्र.१ यांचे हक्कात त्यांचे क्षेत्र लिहून दिले आहे किंवा कसे आणि त्या क्षेत्रामध्ये प्रतिवादी क्र.१ बांधकाम करत आहेत किंवा कसे ही बाब मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणेत आलेल्या प्रिसेप्टमध्ये नमूद होणारी बाब आहे. वादी यांनी मागणी केलेली दाद त्यांचे मूळ दाव्याचे कामी नमूद केलेली नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वर नमूद कारणास्तव वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित नसल्याचे दिसून येत आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

–::– **आदेश** –::–

वादी यांचा निशाणी ५० वरील अर्ज नामंजुर करणेत येत आहे.

सही/–

( जी.ए.कुलकर्णी )

दिनांकः–०३/१२/२०२४.

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),कुडाळ.